
# महाराष्ट्र दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!





# महाराष्ट्र राज्य दंत परिषद

शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, ३ रा मजला, सेंट जॉर्ज हॉस्पिटल कंपाऊंड, सीएसएमटी स्टेशनजवळ, मुंबई – १
दूरध्वनी : +९१ ०२२ २२६१७६४४ • संकेतस्थळ : www.msdcmumbai.org.in

अध्यक्ष – डॉ. नरेंद्र काळे • निबंधक – सौ. शिल्पा किरण परब


# नोंदणीकृत दंत व्यावसायिकांची निवड करा

## बोगस दंत व्यावसायिकांपासून, फसव्या जाहिरातींपासून सावध राहा!

महाराष्ट्र राज्य दंत परिषद ही दंतवैद्य अधिनियम १९४८ च्या कलम २१ नुसार तत्कालीन मुंबई सरकारने २१ सप्टेंबर १९५१ रोजी दंतवैद्यकीच्या व्यवसायाचे नियमन करण्याच्या हेतू गठीत केलेली आहे.

सामान्यतः दंतोपचार करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला आपण दंतवैद्य म्हणतो. परंतु दंतोपचारामध्ये दंतवैद्य (Dentist), दंत आरोग्यरक्षक (Dental Hygienist) आणि दंत कारागीर (Dental Mechanic) या तीनही व्यक्तींची कामे वेगवेगळी असल्यामुळे परिषदेकडे त्यांची नोंदणीही त्यानुसार वेगवेगळी होते व या तिघांच्या कामाचे स्वरूप कायद्याने निश्चित केलेले आहे.

### दंतवैद्य (Dentist)

दंतवैद्य याचा अर्थ, जो दंतवैद्यकीय व्यवसाय करतो/करते ती व्यक्ती असा आहे;

१) मानवी दात किंवा जबडा यावर कोणतीही शस्त्रक्रिया करणे व त्यासंबंधीचा कोणताही रोग, न्यूनता किंवा विकृती यांवर उपचार करणे आणि मानवी दात किंवा जबडा किंवा तोंडाची पोकळी यांच्यासंबंधात क्ष–किरण चित्रणाचे काम करणे;

२) अशी कोणतीही शस्त्रक्रिया किंवा उपचार यांच्यासंबंधात बधिरकारकाचा प्रयोग करणे;

३) कृत्रिम कवळ्या किंवा दातांची सुस्थितीकारक उपसाधने यांची यांत्रिक घडण करणे किंवा त्यांचे नवीकरण करणे;

४) कृत्रिम कवळ्या किंवा दातांची सुस्थितीकारक उपसाधने बसवणे, घालणे, पक्की बसवणे, बनवणे, दुरुस्त करणे किंवा त्यांचे नवीकरण करणे यांची पूर्वतयारी म्हणून, किंवा त्या प्रयोजनासाठी किंवा त्या संबंधात एखाद्या व्यक्तीवर कोणतीही शस्त्रक्रिया करणे अथवा तिच्यावर उपचार करणे, तिला सल्ला देणे किंवा तिच्यावर देखरेख ठेवणे आणि बहुदा दंतवैद्य करतात त्याप्रमाणे अशी कोणतीही शस्त्रक्रिया करणे व त्याप्रमाणे असा कोणताही उपचार करणे, सल्ला देणे किंवा देखरेख ठेवणे.

### दंत आरोग्यरक्षक (Dental Hygienist)

दंत आरोग्यरक्षक याचा अर्थ, दंतवैद्य किंवा वैद्यकीय व्यवसायी नसलेली जी व्यक्ती दातावरील किटण काढते, दात स्वच्छ करते किंवा दातांना पॉलिश करते अथवा दातांच्या आरोग्याबाबत सूचना देते ती व्यक्ती असा आहे.

### दंत कारागीर (Dental Mechanic)

दंत कारागीर याचा अर्थ, जी व्यक्ती दाताच्या कवळ्या व दंतचिकित्सेची उपयंत्रे तयार करते अथवा दुरुस्त करते ती व्यक्ती असा आहे.

### नोंदणीकृत दंतवैद्य कसा ओळखायचा

दंतवैद्य परिषदेच्या नोंदवहीत ज्यांची दंतवैद्य म्हणून नोंद झालेली आहे त्यांना तसे अधिकृत प्रमाणपत्र दिले जाते. या नोंदणीचे दरवर्षी नूतनीकरण केले जाते. असे अधिकृत प्रमाणपत्र दंतवैद्यांनी आपल्या दवाखान्याच्या दर्शनी भागात सर्वसामान्य लोकांसाठी लावणे बंधनकारक आहे.

यामुळे दवाखान्यात गेल्यानंतर डेंटीस्ट म्हणून लिहीलेले प्रमाणपत्र लावलेले आहे की नाही याची खातरजमा करून घ्यावी.

### बोगस दंतवैद्यापासून सावधान

अनेक ठिकाणी गावांमधून, रस्त्याच्या कडेला, गर्दीच्या ठिकाणी गावठी उपचार करणारे फिरस्ते, स्वतःला दंतवैद्य म्हणवणाऱ्या व्यक्ती आढळून येतात. अशा बोगस दंतवैद्यांकडून केल्या जाणाऱ्या अघोरी उपचारांमुळे घातक रोग होण्याची व शारीरिक ईजा/हानी होण्याची शक्यता असते. त्यामुळे अशा व्यक्तींकडून कोणत्याही प्रकारचे दंतोपचार करून घेऊ नये असे आवाहन परिषदेमार्फत करण्यात येत आहे. तसेच अशी व्यक्ती आढळून आल्यास त्यांची तक्रार जिल्हा स्तरावर तसेच तालुका स्तरावरील 'बोगस वैद्यकिय व्यावसायिक समिती'कडे करावी. (शा.नि.क्र. न्यायप्र–०११९/प्र.क्र.०६/अधिनियम दि. २२.०१.२०१९)

### दंतवैद्य अधिनियम 1948 च्या कलम 47 ते 49 नुसार

अशी कोणतीही व्यक्ती,

१. जिचे नाव त्या त्या वेळी नोंदवहीत नोंदवण्यात आले नसेल, तरीही आपले नाव अशा प्रकारे नोंदवण्यात आले आहे असे खोटे अभिवेदन केले किंवा आपले नाव अशा प्रकारे नोंदवण्यात आले आहे हे वाजवीपणाने सूचित होईल अशा बेताने, आपले नाव किंवा अभिधान यांच्या जोडीला कोणतेही शब्द किंवा अक्षरे वापरली,

२. केंद्र शासनाच्या अधिसूचित केलेल्या मान्यता प्राप्त दंतवैद्यकीय अर्हता धारण करीत नसतानाही दंतवैद्य/दंत आरोग्य रक्षक/दंत कारागीर या उपाधीचा गैरवापर करत असेल,

तर दंतवैद्य अधिनियम १९४८ च्या कलम ४७ ते ४९ नुसार कारवाई करण्यात येईल.

### दंत अधिनियम 1948, दंतवैद्य (आचारनीती) (महाराष्ट्र) नियम 1965, भारतीय दंत परिषद विनियम 27 जून 2014 नुसार

- कोणतेही दंतोपचार करताना दंतवैद्य यांनी नोंदणीकृत दंतवैद्य, नोंदणीकृत दंत आरोग्यरक्षक व नोंदणीकृत दंत कारागीर यांचीच सहाय्यक म्हणून त्यांच्या व्यवसायात नेमणूक करावी.
- दंत आरोग्य रक्षक व दंत कारागीर यांच्या कामाचे स्वरुप व मर्यादा निश्चित केलेली आहे. जर एखादी व्यक्ती केवळ दंत आरोग्य रक्षक/दंत कारागीर अर्हता धारण करीत असेल तर त्या व्यक्तीला दंतवैद्याचा व्यवसाय करता येणार नाही. तसे आढळल्यास नियमानुसार कारवाई करण्यात येईल.
- राज्यात अनेक ठिकाणी अर्हताधारक नसलेल्या दंत कारागिरांमार्फत डेंटल लॅब चालवल्या जातात असे आढळून आले आहे. अशा बोगस दंत कारागीरांवर देखील जिल्हा/तालुका स्तरावरील समिती मार्फत कडक कारवाई करण्यात येईल. (शा.नि.क्र. न्यायप्र–०११९/प्र.क.०६/अधिनियम दि. २२.०१.२०१९)